सुविचार

प्रयत्न करत रहा, यश नक्कीच मिळेल.

# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ दैनिक ■धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 132 ■ शनिवार, दि.21 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू ५





७५ वर्षात पहिल्यांदाच गावात बस दाखल

पेज ४

# लाडक्या भावांचा वनवास; चार महिन्यांपासून वेतन नाही

## युवा प्रशिक्षणार्थ्यांकडे शासनाचे दुर्लक्ष; शासकीय आस्थापनांची असहकार्याची भूमिका

## आधार व्हेरिफिकेशन आणि प्रेझेंटी रिपोर्टमुळे मानधन मिळण्यास उशीर

आरंभ मराठी | धाराशिव

अत्यंत गाजावाजा करून सुरू करण्यात आलेली 'लाडका भाऊ'योजना अर्थात मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेतील युवकांवर उपासमारीची वेळ आली आहे.मागील चार महिन्यांपासून लाडक्या भावांना शासनाने वेतनच दिले नसल्यामुळे लाडक्या भावांचा वनवास सुरू असल्याचे चित्र आहे. फेब्रुवारी महिन्यात सहा महिन्यांची मुदत संपलेल्या युवकांना शासनाने पाच महिने मुदतवाढ देऊन योजनेचा कालावधी अकरा महिन्यांचा करण्याचा मोठा निर्णय घेतला.
त्याप्रमाणे फेब्रुवारी महिन्यात पुन्हा हे प्रशिक्षणार्थी युवक कामावर रुजू झाले.परंतु, बदललेली वेबसाईट, शासकीय आस्थापनांनी हजेरी पत्रक वेळेत न देणे तसेच आधार व्हेरिफिकेशनची टाकलेली अट यांमुळे फेब्रुवारी ते मे या चार महिन्यांच्या कालावधीतील वेतन थकीत राहिले आहे.



सत्ताधाऱ्यांसह विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधी देखील या प्रश्नाकडे लक्ष देत नसल्यामुळे लाडक्या भावांवर सध्या उपासमारीची वेळ आली आहे विधानसभा निवडणुकीच्या अगोदर महायुती सरकारने युवकांची मते आपल्याकडे खेचण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना सुरू केली.शासकीय कार्यालयात सहा महिने कामाचा अनुभव मिळेल म्हणून तरुण-तरुणींनी या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. धाराशिव जिल्ह्यातील तब्बल पाच हजार युवक या योजनेतून कामाला लागले. तुटपुंजा पगार असला तरी बेरोजगार युवकांना हाताला काम मिळाल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास दुणावला होता. परंतु, विधानसभा निवडणूक पार पडताच शासनाने शासकीय




कार्यालयातील प्रशिक्षण बंद करण्याचा निर्णय घेतला. प्रशिक्षणार्थ्यांची फक्त खासगी संस्थांमध्ये यापुढे नियुक्ती केली जाणार आहे. त्यातच गेल्या चार महिन्यांपासून हे लाडके भाऊ वेतनापासून वंचित आहेत. यापुढे काम करावे की थांबावे, अशा संभ्रमावस्थेत प्रशिक्षणार्थी युवक आहेत.
फेब्रुवारीमध्ये पुन्हा वाढीव पाच महिन्यांसाठी जे उमेदवार रुजू झाले त्यांचे हजेरी पत्रक संबंधित कार्यालयाकडून कौशल्य विकास विभागास दिले जात नाही अशी तक्रार प्रशिक्षणार्थी करत आहेत. तसेच प्रशिक्षणार्थी उमेदवारांची वेबसाईटवर अगोदरच नोंदणी आणि डॉक्युमेंट अपलोड केलेले असतानाही पुन्हा एकदा आधार व्हेरिफिकेशन आणि डॉक्युमेंट अपलोड करायला सांगितले जात आहे. या सर्व तांत्रिक अडचणीमुळे मागील चार महिन्यांपासून प्रशिक्षणार्थी उमेदवार पगारापासून वंचित आहेत. धाराशिव जिल्ह्यात या योजनेतून ४९८२ तरुण-तरुणी काम करत आहेत. यातील मोजक्या उमेदवारांना पगार मिळाला असला तरी बहुतांश उमेदवार चार महिन्यांपासून पगारापासून वंचित आहेत.

### जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थींची संख्या

**एकूण प्रशिक्षणार्थी -४९८२**

**खाजगी आस्थापना -१५७**

**खाजगी आस्थापनेतील प्रशिक्षणार्थी -१२२१**

**सरकारी आस्थापना -२०८**

**सरकारी आस्थापनेतील शिक्षणार्थी- ३७६१**

### जिल्ह्याला महिन्याला लागतात ५ कोटी रुपये

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेत धाराशिव जिल्ह्यातील ४९८२ तरुण तरुणी प्रशिक्षण घेतात. यांना मानधन म्हणून महिन्याला साधारण पाच कोटी रुपये द्यावे लागतात. ही योजना आता अकरा महिन्यांची झाल्यामुळे वर्षाला ५० कोटींपेक्षा अधिकचा निधी फक्त धाराशिव जिल्ह्यासाठी लागणार आहे.

### पुन्हा पुन्हा तेच डॉक्युमेंट मागितले जातात

युवा प्रशिक्षणार्थी म्हणून आम्ही सुरुवातीला जे जे डॉक्युमेंट मागितले होते ते सर्व त्यावेळी दिले होते. आधार व्हेरिफिकेश देखील केले होते. परंतु, आता पुन्हा तेच डॉक्युमेंट मागितले जात आहेत. त्यामुळे खूप जणांचे पगार होऊ शकले नाहीत.

–ज्योती कागदे
युवा प्रशिक्षणार्थी, वाशी.

**मुदत वाढवली : पाच महिने**

**पदवीधरासाठी मानधन : दहा हजार रुपये**

**बारावी उत्तीर्ण युवकांना : सहा हजार रुपये**

**आयटीआय, पदविका : आठ हजार रुपये**

### शासकीय आस्थापना सहकार्य करत नाहीत

शासकीय आस्थापना प्रशिक्षणार्थी तरुणांना सहकार्य करत नाहीत. हजेरी पत्रक मुद्दाम कौशल्य विभागास पाठवले जात३ल नाही. त्यामुळे पगारास दिरंगाई होते. योजना चांगली असताना शासकीय कर्मचाऱ्यांकडूनच प्रशिक्षणार्थी युवकांची पिळवणूक होत आहे.

–धनाजी हुकमते
अध्यक्ष, मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण संघटना

### पेमेंटसाठी आधार व्हेरिफिकेशन आवश्यक

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेची वेबसाईट बदलली आहे. त्यामुळे पुन्हा कामावर रुजू झालेल्या सर्व प्रशिक्षणार्थी उमेदवारांना आधार व्हेरिफिकेशन करून पुन्हा डॉक्युमेंट अपलोड करावे लागणार आहेत. ज्यांनी प्रोसेस पूर्ण केली आहे त्यांचे वेतन जमा झाले आहे. ज्या उमेदवारांकडून दिलेल्या सूचनांचे पालन झाले नाही त्यांचे वेतन जमा झालेले नाही. सर्व युवा प्रशिक्षणार्थ्यांनी आधार व्हेरिफिकेशन करून पुन्हा डॉक्युमेंट अपलोड करावेत.

–संजय गुरव
सहायक आयुक्त
कौशल्य विकास व रोजगार व उद्योजकता, धाराशिव.

## २०० लिटर गावठी दारू व दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

### अवैध व्यवसायांवर पोलिसांचे छापे

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव पोलिसांनी जिल्ह्यातील अवैध मद्य विरोधी मोहीम तीव्र केली आहे. मागील काही दिवसांपासून गावठी दारूविरोधातील कारवाया वाढवण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर,अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि.१९) अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत १७ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले सुमारे २,३५० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव, २०९ लिटर गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या ३५ सिलबंद बाटल्याअसे मद्य जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या मद्याची एकत्रीत किंमत १,९५,०८५ रूपये आहे. यावरुन म हाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत भूम येथे ८, येरमाळा येथे ४, शिराढोण २ आणि नळदुर्ग, तामलवाडी व परंडा पोलीस ठाण्यात प्रत्येकी एक गुन्हा दाखल करण्यात आला. असे एकूण १७ गुन्हे दाखल करण्यात आले.

## रात्रगस्तीदरम्यान उमरगा येथे एक संशयित व्यक्ती ताब्यात

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा पोलीस ठाण्याचे पथक दिनांक १९ जून रोजी रात्री साडेआठ वाजता उमरगा पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पथकास उमरगा बसस्थानकाच्या पाठीमागे अंधाराचा दबा धरुन बसलेल्या एक व्यक्ती दिसून आला. पथकाला त्याचा संशय आल्याने पथकाने त्याला हाटकले. यावर त्याची विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव दत्ता ज्ञानेश्वर गुंजाळ (वय ३४ वर्षे, रा. बलभिम नगर पेठ बिड ता. जि. बीड) असे सांगीतले. पोलीसांनी अशा रात्री अवेळी फिरण्याचे कारण विचारले असता त्याने पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे दिली. तो चोरीच्या उद्देशाने फिरत असल्याचा संशय आल्याने त्याला ताब्यात घेऊन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र पोलिस कायदा कलम- १२२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पिकअप-मोटरसायकल अपघातात खामसवाडी येथील शेतकऱ्याचा मृत्यू

आरंभ मराठी | गोविंदपूर

कळंब तालुक्यातील गोविंदपूर ते खाम सवाडी रस्त्यावर गुरुवारी (दि.१९) सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास पिकअप व मोटारसायकलची धडक होऊन वृद्ध शेतकरी जागीच ठार झाला. या प्रकरणी शिराढोण पोलिस ठाण्यात गुन्हयाची नोंद करण्यात आली. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार खामसवाडी येथील शेतकरी हरिचंद्र श्रीधर शेळके वय (७२)गुरुवारी सकाळी ७:३० वाजता गोविंदपुर येथील पेट्रोल पंपावरून पेट्रोल भरून मोटरसायकल ने गावाकडे जात होते. त्यावेळी समोरून येणारा पिकअप (एम एच २५पी ५३२९) व मोटरसायकलची धडक बसली व शेळके यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच खामसवाडी व गोविंदपुर



येथील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती. शिराढोण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार राठोड यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला व पिकअप ताब्यात घेतले. मंगरूळ आरोग्य केंद्रात मृताचे शवविच्छेदन करण्यात आले.या प्रकरणी पिकअप चालकाच्या विरोधात शिराढोण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास शिराढोण पोलीस स्टेशनचे जमादार राठोड हे करीत आहेत.

## तुळजापूर पोलीस ठाण्यात बोगस डॉक्टरवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर पोलीस ठाण्यात तुळजापूर ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा देणाऱ्या बोगस डॉक्टरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी सरबन सुबध बिश्वास (वय १९ वर्षे, रा. पश्चिम बंगाल, ह.मु. जवळगा मेसाई ता. तुळजापूर) याने दिनांक १८ जून रोजी जवळगा मेसाई येथे स्वत: म ान्यता प्राप्त वैद्यकीय व्यावसाईक नसताना तसे भासवुन लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल असा वैद्यकीय उपचार केला. तसेच त्याने लोकांकडुन पैसे घेतले. याप्रकरणी फिर्यादी डॉ. उबेद अली सय्यद (वय २७ व्यवसाय नोकरी वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र सलगरा दिवटी) यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम ११०,३१९(२),३१८(४) सह १९५६ कलम१५, १५(२) सह १९६१ कलम ३३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## दोन महिन्यांच्या 'मनाली'चा सह्याद्री अंकुर शिशुगृहात हृदयस्पर्शी प्रवेश

आरंभ मराठी | धाराशिव

आई-वडिलांच्या मायेचा ओलावा लाभायच्या आधीच नशिबाने जणू संकटांची छाया पसरवलेली दोन महिन्यांची कोवळी 'मनाली'.जीवनाच्या या कोवळ्या वळणावर तिचे छोटेसे हृदय कोरडे पडू नये म्हणून सह्याद्री अंकुर शिशुगृहाने तिला प्रेमाने आपलेसे केले आणि तिच्या आयुष्याला नवा सुरुवातबिंदू दिला. 'मनाली'च्या नाजूक हातांनी जरी आयुष्याचा प्रवास अलीकडेच सुरू केला असला, तरी तिच्या डोळ्यांत आशेची नवी ज्योत दिसतेय. सह्याद्री अंकुर शिशुगृहातील ताई-दादांनी प्रेमाची मिठी देत तिचा हात हातात घेतला आणि तिच्या आयुष्याच्या या नव्या पर्वाला मायेचे कवच-कुंपण दिले. सह्याद्री अंकुर शिशुगृह ही विनाअनुदानित विशेष दत्तक संस्था आहे. जिथे जन्मत:च अनाथत्व स्वीकारलेल्या बालकांना नव्या आयुष्याची उमेद दिली जाते. येथे केवळ चार भिंतींचा आसरा नव्हे, तर कोवळ्या हृदयांना प्रेमाची ऊब, सुरक्षेची खात्री आणि शिक्षणाची दिशा दिली जाते. नुकत्याच एका महिन्याच्या कालावधीत दोन बालकांना दत्तक देण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाली. त्यांच्या चेहऱ्यावरील समाधानाचा हसू हा समाजातील प्रत्येक संवेदनशील नागरिकासाठी प्रेरणेचा दीप आहे. संपूर्ण दत्तक प्रक्रिया बाल कल्याण समिती व जिल्हा महिला व बाल विकास विभाग यांच्या म ार्गदर्शनाखाली पार पडते. संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. रमेश दापके आणि मार्गदर्शक डॉ. दिग्गज दापके-देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ही संस्था नि:स्वार्थ सेवा, माया आणि संवेदनशीलतेचा वसा जपत कार्यरत आहे. दाते, संवेदनशील नागरिकांनी या कार्यात आपले योगदान द्यावे, असे आवाहन डॉ. दिग्गज दाबके यांनी केले.

# बँकांनी पिक कर्जासह इतर योजनांसाठी शेतकऱ्यांना वेळेत कर्ज उपलब्ध करून द्यावे

## जिल्हास्तरीय बँकर्स आढावा बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्याचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामासाठी सर्व बँकांनी पिक कर्ज आणि अन्य योजनांसाठीचे कर्ज वेळेत उपलब्ध करून द्यावेत असे निर्देश जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी सर्व बँकांना दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी (दि.२०) जिल्हास्तरीय बँकर्सची आढावा बैठक जिल्हाधिकारी पुजार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली यावेळी ते बोलत होते. या बैठकीला जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चिन्मय दास, नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक गोखले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, भारतीय रिझर्व बँकेचे प्रादेशिक अधिकारी अमित कुमार व निशांत यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुजार म्हणाले की, बँकांनी पशुसंवर्धन, मत्स्य व्यवसाय, फळबाग आणि रेशीम शेतीकडे विशेष लक्ष देऊन विकासाला चालना द्यावी.
खरीप हंगामात बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करावे. शेतकऱ्यांचा पिकविमा काढून त्यांना नुकसान भरपाई मिळण्यास मदत होईल, शेतकऱ्यांचे किसान क्रेडिट कार्ड काढण्यात यावे. प्रत्येक तालुक्यात बँकांशी संबंधित कामे पार पाडण्यासाठी बँकांचा एक समन्वय अधिकारी नियुक्त करावा. यामुळे शेतकरी तसेच विविध कर्ज प्रकरणे त्वरित मंजूर करण्यास मदत होईल. शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपासाठी बँकस्तरावर शिबिरांचे आयोजन करावे. जून २०२५ अखेरपर्यंत बँकांनी ७० टक्केपेक्षा जास्त पीक कर्जाचे वाटप करावे, मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी म त्स्य सहकारी संस्थांची बँकासोबत बैठक घेऊन त्यांना कर्ज वाटपासाठी पुढाकार घ्यावा, असे पूजार यांनी सांगितले. प्राधान्य क्षेत्राचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात यावे असे सांगून पूजार म्हणाले की,जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे नुतनीकरण करण्यास त्यांना प्रोत्साहित करावे. मुद्रा बँक योजनेतून जास्तीत जास्त कर्ज उपलब्ध करून द्यावे. यामुळे त्यांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.प्रधानमंत्री अन्न सूक्ष्म प्रक्रिया उद्योग या योजनेतील प्रस्तावात त्रुटी असेल तर संबंधितांना परत करून त्रुटीची पूर्तता करून पुन्हा परिपूर्ण






प्रस्ताव सादर करावे व त्या प्रकरणांना बँकांनी मंजुरी द्यावी, म्हणजे उद्योग व्यवसायाला चालना मिळण्यास मदत होईल, असे ते म्हणाले.रेशीम विकास विभागाने आरसेटीच्या माध्यमातून युवा वर्गातील शेतकऱ्यांना प्रशिक्षण द्यावे,असे सांगून पुजार म्हणाले की,त्यामुळे रेशीम शेतीला प्रोत्साहन मिळेल व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे जास्तीत जास्त कर्ज प्रकरणे मंजूर करावी. त्यामुळे अनेकांना या योजनेमुळे रोजगार उपलब्ध होण्यास मदत होईल. यासाठी बँकांनी तालुकास्तरावर शिबिराचे आयोजन करावे. महिला बचत गटांचे कर्ज प्रकरणे बँकांनी मंजूर करावे. बँकांनी केवळ कर्ज प्रकरणे मंजूर करून चालणार नाही तर प्रत्यक्षात कर्ज उपलब्ध करून द्यावे असे त्यांनी सांगितले. यावेळी शासनाच्या विविध
महामंडळाच्या कर्ज प्रकरणांचा आढावा घेण्यात आला.विविध बँकांचे जिल्हा समन्वयक तसेच विविध महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यावेळी उपस्थित होते.बँकांनी मंजूर केलेल्या व प्रलंबित असलेल्या कर्ज प्रकरणांची माहिती जिल्हा व्यवस्थापकांनी यावेळी दिली.

# दूध डेअरीमध्ये भिंत कोसळून कामगाराचा जागीच मृत्यू, एकावर सोलापुरात उपचार






आरंभ मराठी | ईटकळ

बाभळगाव-ईटकळ येथील वैष्णवी दूध डेअरीची भिंत अंगावर पडल्यामुळे शुक्रवारी (दि.२०) तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. बांधकाम केलेली भिंत पाडत असताना ती अंगावर कोसळल्याने रोहित मनजितसिंग हजारे (वय २८) हा तरुण जागीच ठार झाला. तर बाळासाहेब घाडगे (रा. कागल) हे जखमी झाले असून त्यांच्यावर सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. वैष्णवी दूध डेअरीमध्ये दूध भुकटी व दुग्धजन्य पदार्थ प्रोडक्शन केले जात होते. डेअरीच्या मालकासह इतरांवर गुन्हा दाखल झाल्यामुळे चार-पाच वर्षापासून दुध डेअरी बंद अवस्थेत होती. दुसऱ्या एका व्यक्तीने भाडेतत्त्वावर दूध डेअरी चालवण्यासाठी घेतली असून त्याचे दुरुस्तीचे व बांधकाम व पाडकाम काम सुरु होते. नवीन बांधकाम केलेल्या इमारतीमध्ये नको असलेल्या चार इंची भिंती पाडत असताना रोहित हजारे यांच्या अंगावर भिंत कोसळल्याने त्याखाली दबून त्याचा मृत्यू झाला. एक महिन्यापूर्वीच त्याचा विवाह झाला होता तसेच घरामध्ये तो एकुलता एक मुलगा होता त्यामुळे त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. नवीन केलेले बांधकाम इमारत ही निकिष्ट दर्जाची असल्याचे सांगितले जात आहे. बांधकाम संबंधीत निगडित असलेल्या व्यक्तीला कामाला लावणे अपेक्षित होते. परंतु, बांधकामाची काहीच माहिती नसलेल्या रोहितला हे काम लावल्याने त्याचा नाहक बळी गेला.याबाबत नळदुर्ग पोलीस स्टेशनमध्ये गुन्ह्याची नोंद झाली असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

संपादकीय शनिवार, दि.21 जून 2025

# भूम शहराचा पाणी प्रश्न पेटला; अमृत -२ योजनेवरून चक्का जाम आंदोलनाचा इशारा

## योजनेच्या विरोधात आणि समर्थनार्थ राजकीय आखाडा पेटला

आरंभ मराठी |भूम

भूम शहरासाठी अमृत २ योजनेतून आरसोली येथील धरणातून पाणीपुरवठा व अंतर्गत पाईपलाईनचे काम सुरू असतानाच योजना वादाच्या भोवऱ्यात अडकत चालली आहे. या योजनेच्या कामासाठी भूम शहरात अमृत २ प्रमाणे नागरिकांचेही दोन गट गट झाले असून, शहरातील विरोधात व समर्थनात गटबाजी बरोबरच आरसोली येथील ग्रामस्थांना देखील पाण्याला विरोध केला आहे. अमृत २ साठी आता भूम शहर बंद व चक्काजाम करण्याचा इशारा नागरिकांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

राबवण्यात येत असलेल्या अमृत-२ वाढीव पाईपलाईन योजनेचा तीव्र विरोध स्थानिक नागरिक आणि सर्वपक्षीय प्रतिनिधींनी केला आहे. सदर योजनेअंतर्गत घरगुती नळांना मीटर लावून कर आकारणी करण्याचा निर्णय नगर प्रशासनाने घेतला असून, यामुळे सामान्य नागरिकांवर अवास्तव आर्थिक भुर्दंड लादला जाणार आहे, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. नागरिकांच्या वतीने उपविभागीय अधिकारी भूम यांना निवेदनात म्हटले आहे की, सदर योजनांची भूम शहरात गरज नसताना लादण्यात येत आहे. २००८ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंतर्गत टाकण्यात आलेल्या पाईपलाईनमुळे पुढील ३० ते ४० वर्षे पाणीपुरवठा सुरळीत चालू शकतो. असे असताना नव्याने वाढीव पाईपलाईन घालणे हे अनावश्यक आणि प्रशासन-कंत्राटदार यांच्या संगनमतातील आर्थिक गैरव्यवहार झाकण्यासाठीचे सुरू असल्याचे म्हटले आहे. पाईपलाईन टाकण्यासाठी शहरातील नुकतेच बनवलेले सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक, डांबरी रस्ते जेसीबी आणि ब्रेकरच्या सहाय्याने फोडले जात आहेत. परिणामी घरांना तडे जाणे, रस्त्यांचे नुकसान आणि नागरिकांचे मोठे हाल सुरू आहेत. तत्कालीन प्रशासक तानाजी चव्हाण यांनी निकृष्ट दर्जाचे काम, बोगस बिले व आर्थिक अपहार केल्याच्या तक्रारी आधीच प्रशासनाकडे दाखल आहेत. तरीही चौकशी पूर्ण होण्याआधीच पुन्हा नव्या योजनेद्वारे नागरिकांना वेठीस धरले जात आहे. नवीन योजनेनुसार प्रत्येक नळाला मीटर बसवून कर आकारणी केली जाणार आहे. परंतु याबाबत नागरिकांना कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. भूम शहरातील सामान्य नागरिकांचे उत्पन्न आणि आर्थिक



स्थिती लक्षात घेता ही योजना पूर्णतः अन्यायकारक आणि परवडणारी नाही, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अमृत २ योजना तात्काळ स्थगित न केल्यास, बुधवार दिनांक २५ जून रोजी संपूर्ण भूम शहर बंद ठेवण्यात येईल व गोलाई चौकात सकाळी ११ वाजता तीव्र चक्का जाम आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सर्वपक्षीय प्रतिनिधींनी दिला आहे. आंदोलनाची पूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असेही निवेदनात म्हटले आहे. निवेदन देताना काँग्रेसचे तालुकाअध्यक्ष रुपेश आप्पा शेंडगे, भाजप तालुकाअध्यक्ष संतोष सुपेकर, उबाठा पक्षाचे तालुका अध्यक्ष अनिल शेंडगे, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप शाळू , राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष विनोद नाईकवाडी, भाजप शहराध्यक्ष बाळासाहेब वीर, पॅन्थर सेना अध्यक्ष चंद्रमणी गायकवाड, माजी नगरसेवक पिंटू माळी, अमोल सुरवसे, शंकर खामकर, सिद्धांत जाधव, विहंग कदम, दीपक पवार, फिरोज बागवान, महादेव शेंडगे, निलेश शेळके, तसेच मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.

# हरवलेला सात वर्षांचा मुलगा सुखरूप पालकांच्या स्वाधीन; स्वच्छता विभागाने दाखवली तत्परता

आरंभ मराठी | तुळजापूर

माढा तालुक्यातील मैसगाव (जि. सोलापूर) येथून आपल्या आई-वडीलांसोबत तुळजापूर येथे श्री तुळजाभवानीच्या देवींच्या दर्शनासाठी आलेला स्वराज गोपाळ सातव (वय ७ वर्षे) हा चिमुकला मुलगा शुक्रवारी (दि.२०) दर्शनाच्या गर्दीत अचानक हरवला होता. पालकांनी सैरभैर होऊन मंदिर परिसरात त्याचा शोध घेतला, मात्र तो मिळून येत नव्हता. दरम्यान, कलोळतीर्थ परिसरात फिरताना हा मुलगा एकटाच रडत असल्याचे स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. तत्काळ स्वच्छता विभागाचे कर्मचारी ऋषिकेश पवार, सोमनाथ चव्हाण, रुपेश बेले व प्रवीण कोळगे यांनी या बाबतची माहिती प्रशासकीय कार्यालयात दिली. या घटनेची दखल घेत स्वच्छता निरीक्षक मनोज घोडगे व सहायक स्वच्छता निरीक्षक अक्षय साळुंखे यांनी तात्काळ पुढील कार्यवाही सुरू केली. प्रशासनाच्या सहकार्याने मुलाची ओळख पटवून त्याचे आई-वडील शोधून काढण्यात आले आणि त्यांना त्यांचा मुलगा सुखरूप सुपूर्द करण्यात आला. स्वराजच्या पालकांनी स्वच्छता विभागाचे तसेच प्रशासनाचे आभार मानले. गर्दीच्या ठिकाणी प्रशासनाचे योग्य नियोजन आणि कर्मचाऱ्यांची सतर्कता यामुळे एक मोठी अघटित घटना टळली.

# पोलीस भरती झाल्याबद्दल कुंभार यांचा सत्कार

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२०) महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी कॅडेट मानकोबा कुभांरचा महाराष्ट्र पोलीस दलात भरती झाल्यामुळे त्याचा अभिनंदन व सत्कार केला. तो राजेगाव येथील असुन वडिल शेतकरी अत्यंत गरिब, हालाकीच्या परिस्थितीतून मानकोबाला शिक्षण दिले. लहानपणापासुनच अंगी जिद्द, चिकाटी, खेळाडुवृत्ती असल्यामुळे पोलीस होण्याचे स्वप्न व अंगावर खाकी वर्दी घालावी ही उमेद उराशी बाळगुण खुप मेहनत घेऊन तो चंद्रपुर जिल्हयामध्ये पोलीस विभागात कार्यरत आहे. पदवीचे बी.एस्सी, एनसीसी चे शिक्षण घेण्यासाठी तो उमरगा येथील श्री छ शिवाजी म हाविद्यालयात प्रवेश घेतला. त्याने या संधीचे सोने केले. शाळा, महाविद्यालयात शिक्षण घेत असताना सुद्धा त्याने मैदानी धावणे स्पर्धेत विभागीय, विद्यापीठ, राज्यस्तरीय, स्पर्धेमध्ये यश संपादन केले. स्वतःच्या स्वबळावर जिद्द, मेहनत, कठोर परिश्रम, अभ्यास आत्मविश्वासाच्या




बळावर त्यांने हे यश संपादन केले. त्याबदल प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी त्याच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ विलास इंगळे डॉ.पद्माकर पिटले, प्रा गुंडाबापू मोरे, प्रा शैलेश महामुनी, नितीन कोराळे, राजकुमार सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ गिरीधर सोमवंशी यांनी तर आभार डॉ विनोद देवरकर यांनी मानले.

# अरण्यऋषी वनास पोरके झाले!

'अरण्यऋषी' या टोपणनावाने प्रसिद्ध असलेले पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे काल सोलापूर येथे निधन झाले. राज्य शासनाच्या वनविभागातून उपमुख्य वनसंरक्षक पदावरून निवृत्त झालेले चितमपल्ली हे जेष्ठ पक्षीतज्ञ वन साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहे. वनविभागात नोकरीमध्ये न रमता वन्यजीवांवर ते मनापासून प्रेम करीत होते. वन्य प्राण्यांमध्ये भूचर, जलचर, निशाचर,उभयचर,हिस्त्र प्राण्यांपासून ते अतिसूक्ष्म वन्यजीवांबद्दलची इंत्यभूत माहिती गोळा करीत राहिले. एवढेच नव्हे तर सामान्यांना समजेल अशा पद्धतीने त्यांनी वन्यजीवांवर लेखन सुद्धा त्यांनी केले आहे.

'' वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे ''

या सार्थ वचनाला समर्पित जीवन अर्पित करणारे मारुती चितमपल्ली यांनी वन्यजीवांच्या संबंधित उत्तमोत्तम माहिती पुस्तकांच्या रूपाने सम ाजापुढे आणली. रातवा..रानवाटा.. निलावंती.. प्राणीकोश..सुवर्णगरुड..निसर्ग वाचन ..शब्दांचे धन.. मृगपक्षीशास्त्र..जंगलांचे देणे.. केशराचा पाऊस..घरट्यांच्या पलीकडे.. आनंदाचे बगळे.. पक्षी जाय दिगंतरा..एका कबुतराची कथा (चित्रग्रीव) यासारखी पस्तीस पुस्तके वन्यजीवांचे सूक्ष्म निरीक्षण करून तसेच वन भटकंती करून त्यांनी लिहिली आहेत. आपल्या वन्यसेवेची छत्तिस वर्ष व त्यानंतर ही पुढे आजपावतो वन्य अभ्यासक म्हणून कार्यरत राहिले.विदर्भात प्रसिद्ध असलेले अभयारण्य नवेगाव बांध येथे वनसेवेत असताना अनुभवातून लिहिलेले पुस्तक 'नवेगाव बांधचे दिवस' प्रसिद्ध आहे. 'चकवाचंदन ' हे आत्मचरित्र सुद्धा त्यांनी लिहून काढले आहेत. वन सेवेत असताना आपल्या अनुभवांना शब्दांची जोड देण्याकरिता प्रसिद्ध मराठी साहित्यिक



वंदनीय गाडगेबाबांचे सहकारी गो.नि.दांडेकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभल्याचे ते एका मुलाखतीत म्हणतात. त्यांच्या वन साहित्याची दखल घेऊन २००६ ला सोलापूर येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ही त्यांनी भूषवले होते.

मारुती चितमपल्ली यांचे वडील भुजंगराव यांना वाचनाची आवड,तर आईला अरण्य भटकंती करण्याची होती. वनाबद्दलचे आकर्षण त्यांना बालपणीचं लागले होते. हनुमंत मामांनी बालपणी सांगितलेल्या वन प्राण्यांच्या कथेत रमून जायचे.आई-वडील,मामांनी सांगितलेल्या रंगबिरंगी फुलपाखरे,विविध रंगांनी नटलेले पक्षांच्या कथा याद्वारे झालेले आकलन मोठेपणी कामी आले. उच्च शिक्षणानंतर वनसेवेत दाखल झाले. बालपणीच्या कथा वन सेवेत असताना प्रत्यक्ष त्यांनी अनुभवल्या. हे ज्ञान स्वतःपुरतेच त्यांनी मर्यादित राहू नये म्हणून विपुल लेखन केले जे आज पक्षीतज्ञांच्या वन्य अभ्यासकांच्या ज्ञानात व संशोधकाच्या संशोधनात भर घालण्यात मोलाचे योगदान देत आहे.

भारतीय पक्षीविश्व जगात जागतिक स्तरावर पोहोचविणारे ज्येष्ठ पक्षीतज्ञ डॉ. सलीम अली व वन्यजीव अभ्यासक अरण्यऋषी मारुती चितमपल्ली या दोघांच्या जन्मदिवसांचे औचित्य साधून २०२० पासून राज्यशासन ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर दरम्यान पक्षी सप्ताहाचे दरवर्षी आयोजन करीत असते. विशेष म्हणजे अलीकडेच त्यांना भारत सरकार तर्फे दिल्या जाणारा पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. वन्यजीव अभ्यासका व्यतिरिक्त त्यांचे मराठी भाषेसाठी सुद्धा मोलाचे योगदानलाभले आहे. असा हा बहुगुणी अस्सल वन्यजीवांशी सख्ख्य असलेला 'अरण्यऋषी 'काळाने हिरावून घेतला. भावपूर्ण श्रद्धांजली..!



**शशिकांत मधुकर तोटे**
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# नका सांगू कोणाला,चांगले वाग म्हणून..

**आता** तो काळ राहिला नाही कोणाला चांगले वाग म्हणून सांगण्याचा. कारण कोणाला चांगले वाग म्हणून फुकटचा सल्ला दिला तर तो ऐकून घेईल आणि लगेच चांगले वागू लागला असे काही घडणार नाही. याउलट जर आपण कोणाला चांगले वागण्याचा सल्ला दिला तर तो लगेच प्रतिक्रिया देईल की भावा माझ्या वागण्याचा तुला त्रास होत असेल तर ती तुझी समस्या आहे माझी नाही. मी कसे वागावे हे तू नको सांगू मला.मी चांगलेच वागतो तू कसे वागतोस ते तू बघ.हे बोलणे ऐकल्यावर वाईट वागणाऱ्याला चांगले वाग म्हणून फुकटचा सल्ला न दिलेला बरा. वाचक मंडळी हे खरे आहे की वाईट वागणे,वाईट बोलणे,वाईट चारित्र्य ठेवणे आणि वाईटांची संगत धरणे हे सर्वांचे आवडते छंद झाले आहेत.बऱ्याच पालकांचे पाल्य शिक्षणाबाबत गंभीर राहिलेले नाहीत.शाळेला किंवा कॉलेजला जात आहे म्हणून घरून निघायचे आणि वाईट,व्यसनी व चारित्र्यहीन मित्रांसोबत कुठे तरी भटकंती करायची.व्यसने करायची, वाईट बाता करायच्या आणि अमूल्य वेळ वाया घालवायचा हे आवडते छंद झाले आहेत.अशा मुलांना कोणी विचारणा केली तर निर्लज्ञपणे म्हणतात,ओ अंकल तुम्ही नका आम्हाला शहाणपणा शिकवू,आम्ही काय करू नये व काय करावे हे सांगणारे तुम्ही आमचे कोण?आम्ही आमच्या आईवडिलांना घाबरत नाही तेव्हा तुम्हाला कोण घाबरेल.तुमची वाट पुढे बघून चालायला लागा.दारू पिणाऱ्यांना दारू पिऊ नये,दारू हानीकारक असते म्हणून सल्ला दिला की ते बोलतात कसे,पैसे आमचे,दारू आम्ही पितो त्रास तुम्हाला का होतो?आता यावर न बोलले बरे! एका घरी बराच वेळ झाला सासू सुनेचे जोरदार भांडण सुरू आहे.ते भांडण ऐकून सगळे शेजारी पूर्णतः वैतागून गेले आहेत. तरीपण ते भांडण सोडवायला कोणी पुढे येण्याचे धाडस करत नाही.सुनेची बाजू घेतली तर सासू खेकसते आणि सासूची बाजू घेतली तर सूनबाई नाराज होते.अशावेळी भांडण सोडवायला न गेलेले बरे! अशी भित्री मानसिकता झाली आहे लोकांची.वडिलांचे निधन झाल्यानंतर शेतीच्या वाटणीसाठी दोन भाऊ भांडण करतात,कोर्टात जातात,दोघेही वकील लावतात, वकीलाची मोठी फी भरतात आणि आपलेच नुकसान करून घेतात. खरेतर शेताच्या वाटणीचा प्रश्न सामंजस्याने ही मिटला असता. माझाच सख्खा भाऊ आहे गेला त्याला थोडा शेतीचा जास्त तुकडा तर काही बिघडत नाही अशी समजूत भावाने भावासाठी घ्यायला हवी होती.पण दोघांचे भांडण आणि दुसऱ्याचा लाभ ही कुत्सित मानसिकता आपण सोडायला तयार नाही!या दोन भावांना गावातील काही लोक चांगला सल्ला देतात पण दोघे भाऊ ऐकायच्या मानसिकतेचे नसतात.शेती वडिलांची,भांडण दोघा भावांचे आणि फायदा परक्या लोकांचा हे गावोगावी सुरू आहे. कामचुकार व्यक्तीला कामचुकार म्हटले की खूप राग येतो.भ्रष्टाचारी व्यक्तीला भ्रष्टाचारी संबोधले की खूप राग येतो आणि व्याभिचार करणाऱ्या लोकांना चारित्र्यहीन म्हटले की राग येतो.तुम्ही वाईट कृत्ये केले तरीही समाजाने गप्प राहावे अशी तुमची मानसिकता कशासाठी? तुम्ही काहीही वाईट कृत्ये करावे आणि इतरांनी डोळे बंद करून घ्यावेत असे चालणार नाही.तुम्ही नेहमी वाईट वागायचे आणि चांगल्या लोकांनी ते मुकाटपणे सहन करायचे, तुम्हाला नावे ठेवायची नाहीत ही मानसिकता बदला आता.तरीही तुम्हाला राग येतो. आणि तुम्ही चांगल्या लोकांवर बिनबुडाचे आरोप करता,चांगल्या लोकांना नावे ठेवता हे किती योग्य असते याचा विचार तुम्ही वाईट लोक कधीच करत नाही.कोणी चांगले वाग म्हणून सांगितले की तुमच्या अंगाचा तिळपापड होतो! हे सगळे पाहून चांगल्या लोकांना सल्ला द्यावा वाटतो की ही दुनिया वाईटांनी खचाखच भरलेली आहे.या वाईट लोकांना चांगले वागण्याचा सल्ला अजिबात देऊ नका.चांगल्या लोकांनी वाईट लोकांच्या दुष्कृत्यांकडे लक्ष न दिलेलेच बरे.घाणीने भरलेल्या गटारात धोंडा फेकून अंगावर शिंतोडे उडवून न घेतलेले बरे.एका वाईट व्यक्तीला वाईट म्हटले की सगळे वाईट लोक एकत्र येतात आणि चांगल्या लोकांची बदनामी करतात.ही बदनामी जास्त वेळ टिकत नाही.तरीपण वर म्हटल्याप्रमाणे कोणाला चांगले वागण्याचा सल्ला कधीच देऊ नका,नाक दाबून बुक्यांचा मार सहन करत बसा!आपण कितीही ओरडलो तरीही ही दुनिया बहिरी आहे.इथे वाईटांना डोक्यावर घेऊन नंगानाच चालू आहे.खऱ्याला न्याय नाही असत्य मोकाट आणि सुसाट सुटले आहे.


**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर
मो.९५४५४४२६४८.

# श्री तुळजाभवानी देवीजींच्या सिंहासन पूजेचे जुलै महिन्याचे ऑनलाईन नोंदणी वेळापत्रक निश्चित

आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानी देविजींच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगना व इतर राज्यातून भाविक कुलदेवता असल्याने या ठिकाणी कुलाचार व कुलधर्म करण्यासाठी मोठ्या संख्येने भक्तिभावाने येतात. श्री देविजीची सिंहासन पुजा ही अत्यंत महत्वाची मानली जाते. ही सिंहासन पुजा नोंदणी ऑनलाईन पध्दतीने श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर https://shrituljabhavani.org उपलब्ध करून देण्यात येणार आहे.


जुलै महिन्यातील सिंहासन पुजा ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येईल याची सर्व भाविक भक्त, महंत, पुजारी, सेवेकरी व नागरीकांनी नोंद घ्यावी.भाविकांनी सिंहासन पुजा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अधिकृत संकेतस्थळ: https:shrituljabhavanitempletrust.org यावर सिंहासन पुजा नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत होती. जुलै म हिन्यात सिंहासन पूजेच्या नोंदणीसाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. भाविकांनी सिंहासन पूजेसाठी /http:shrituljabhavanitempletrust.org/ यावरून सिंहासन पूजा पास बुकिंग या मेन्यूवर क्लीक केल्यानंतर https:shrituljabhavanimataseva.org/या लिंकवर प्रवेश करून भाविकांनी आपली सिंहासन पुजेची नोंदणी करावी. सिंहासन पुजा नोंदणी २१ जुन २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरू झाली आहे. ती २६ जुन २०२५ रोजी सकाळी १० वाजतापर्यंत करता येईल. ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने प्रथम सोडत व भाविकांना पेमेंटसाठी एसएमएस २७ जुन २०२५ रोजी १०.३० वाजता पाठविण्यात येतील.भाविकांनी प्रथम सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २७ जुन २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजतापासून ते २८



जुनपर्यंत सकाळी १० वाजतापर्यंत करावे. सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पद्धतीने व्दितीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी २८ जुन २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत एसएमएस पाठविण्यात येतील.भाविकांनी व्दितीय सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २८ जुन २०२५ रोजी सकाळी १०.३० ते २९ जुन रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करावे. प्रथम व व्दितीय फेरीत सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने तृतीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी २९ जुन रोजी सकाळी १०.३० वाजतापर्यंत एमएमएस पाठविण्यात येतील. भाविकांनी तृतीय सोडतीचे ऑनलाईन पेमेंट २९ जुन रोजी सकाळी १०.३० ते ३० जुन रोजी रोजी सकाळी १० वाजतापर्यंत करावे.जुलै म हिन्यातील अंतीम सिंहासन पुजा बुकींग झाल्याची यादी ३० जुन रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रसिध्द करण्यात येईल.

# विचारावर विचार करूया

**विचारावर** विचार करणे म्हणजे आपल्या मनात येणाऱ्या विचारांचे मूळ शोधून काढणे होय. पुढे जाऊन तो विचार योग्य की अयोग्य आहे, हे ठरवणे; आणि खूप विचार मंथन करून योग्य विचार स्वीकारणे. या प्रक्रियेलाच शिक्षण शास्त्रात '' म्हणतात. म्हणजे ,' ' स्वतःच्या विचारावर विचार करत राहणे. खरंतर आपण हे फारच कमी करत असतो;आणि हेच आपल्याला नवीन गोष्टी शिकण्यामध्ये अडथळा बनत असतं. पूर्वग्रह दूषित भावनेने आपण कोणतीही नवीन गोष्ट शिकू शकत नसतो. पाटी कोरी असेल तरच त्यावर नवीन अक्षरे लिहिता येतात. याच प्रकारे आपल्या स्वतःच्या असणाऱ्या समजूती काही वेळेस आपणास नवीन गोष्टी शिकण्यास अडथळा ठरतात. विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी आणि शिकणाऱ्या प्रत्येक घटकाला '' हे प्रत्येक क्षणाला करता आले पाहिजे. वाचताना मला किती समजले, एकाग्रता भंग तर होत नाही ना? पुढे न समजलेल्या भागाचे करत राहणे यावर सतत विचार करत राहिले पाहिजे. खरंतर करणे म्हणजे स्मार्ट होणे,शहाणे होणे,परिपूर्ण आणि अव्वल दर्जेदार होणे. किशोरवयीन काळात मुला-मुलींमध्ये प्रामुख्याने भिन्न लिंगीय व्यक्तींबद्दल आकर्षण निर्माण होऊ लागते,अशा काळात पालकांनी आणि शिक्षकांनी जर मुलांना याबाबत करायला लावले तर पुढे घडणाऱ्या घटना टाळता येतील. हे कसे करता येईल? या मुलांना जर त्यांच्या मनामध्ये येणाऱ्या भिन्नलिंगीय व्यक्ति बद्दलच्या आकर्षणाच्या विचारावर तटस्थपणे विचार करण्यास सांगितले, तर ती मुले विचार करू लागतील. माझ्या मनात यापूर्वी असे विचार येत नव्हते, आता हे विचार का येऊ लागले? या बदला मागील कारणे ते जिज्ञासूपने शोधतील.योग्य-अयोग्य ठरवतील. या बदलाकडे अधिक लक्ष न देता,तो एक हार्मोन मधील बदलाचा परिणाम आहे;यासारखे योग्य कारण शोधतील व आपल्या स्वतःच्या करिअर कडे लक्ष देऊन पुढे जातील.आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आणि प्रत्येक क्षणाला केले तर जीवनातील अनेक समस्या, चुका आणि अडथळे टाळता येतील.



यासाठी जाणीवपूर्वक विचार करता आला पाहिजे. आभास निर्माण करता आला पाहिजे. 'विश्लेषणात्मक शक्ती' वाढवली पाहिजे. 'मूल्यमापन क्षमता' वृद्धिगत करता आली पाहिजे. 'सृजनशीलता'आणि 'संश्लेषण' या गोष्टी अंगीकारता आल्या पाहिजेत. स्वतःचे स्वतंत्र व्यक्तीमत्व आणि स्वतंत्र विचार क्षमता,स्वतंत्र दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी '' करायला आले पाहिजे . 'इंटरनल गाईडची' भूमिका निभावता आली पाहिजे. 'सूर्य पृथ्वीभोवती फिरतो',हा सिद्धांत ज्या काळात रूढ होता त्या काळात गॅलिलिओने 'पृथ्वी सूर्याभोवती फिरते', हा सिद्धांत इटलीच्या समुद्रकिनाऱ्यावर समुद्रांच्या लाटांचे निरीक्षण करत असताना '' करून मांडला. जगभरात असे अनेक वैज्ञानिक शोध '' या माणसाच्या मनोविश्लेषणात्मक पद्धतीमुळेच लागले आहेत. जाणीवपूर्वक आपण करायला लागलो, तर वर्तमानात यायला शिकू. आज 'ओव्हर थिंकिंग' मुळे उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकार यासारखे भयंकर आजार माणसाला जडत चालले आहेत.'ओव्हर थिंकिंग' म्हणजे भूतकाळातील स्वतःच्या झालेल्या चुका आणि भविष्यकाळाविषयी चिंता यावर सतत विचार करत राहणे. यावर उपाय म्हणजे वर्तमानात येणे. वर्तमानात येण्यासाठी स्वतःच्या श्वासावर लक्ष देणे,प्राणायाम यासारख्या उपायासोबतच जर आपण '' करत राहणे हे सुद्धा फायद्याचे ठरेल. मनाला जपणे ही आज काळाची गरज बनली आहे. आज नको तिथे आपण हळवे, तर नको तिथे कठोर होत आहोत. मला एखाद्याचा राग का येतो? एखाद्याचा द्वेष का वाटतो? मी अचानक हिंस्र का बनतो? मला भीती का वाटते? आनंद का होतो ? अशा अनेक मनाच्या अवस्था विषयी आपण '' करू शकलो तर, स्वतःचे मानसिक संतुलन राखू शकू. इतर प्राण्यांच्या तुलनेत, मानवांना त्यांच्या आंतरिक विचारांची आणि भावनांची जाणीव असते. मानवांना त्यांच्या वर्तमान मानसिक स्थितीबद्दल देखील माहिती असते . हे स्व-ज्ञान '' चा भाग आहे. आणि त्याचा उपयोग स्वतःच्या विचार प्रक्रियेचे मूल्यांकन करण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार बदल करण्यासाठी केला जाऊ शकतो. खरंच ''लोकांना त्यांच्या विचार प्रक्रिया समजून घेण्यास आणि त्यांचा प्रभावीपणे वापर करण्यास मदत करू शकते. मला वाटते,कल्पकता,सर्जनशीलता,वेळेचे भान,जाणीवा,सुसंवाद,समस्या सोडविता येणे,सकारात्मक दृष्टीकोनबदलांवर नजर ठेवण्याची कला,सतत नवीन शिकण्याची तयारी,कल्पनेची प्रभावशाली मांडणी,विश्लेषणविषय शोधणे, त्याची माहिती गोळा करणे,नियोजन,पूर्व तयारी आणि आयोजन यासारखी 'सॉफ्ट स्किल्स' आणि निरनिराळ्या तंत्रांची जाण असणे, त्यांचा वापर करता येणे,वेगवेगळ्या 'फ़ॉर्मुला'चा वापर करण्याचे कौशल्य (उदा. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, विज्ञान तंत्रज्ञानातील विविध फ़ॉर्मुले ),मोजमाप करता येणं,शारीरिक कष्टाची कामं,एखादी गोष्ट प्रत्यक्ष करणं यासारखी 'हार्ड स्किल्स'विकसित करण्यासाठी '' करणे आवश्यक आहे. 'विचारावर विचार करूया' ही जाणीव प्रत्येकाने अंतर प्रेरणा बनवली पाहिजे.




**किशोर जाधव,**
सोलापूर,
मो.९९२२८८२५४१

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

# पर्यटनस्थळी पर्यटकांवर १९ ऑगस्टपर्यंत निर्बंध

आरंभ मराठी | सातारा



सातारा जिल्ह्यातील सर्व पर्यटन स्थळांवर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी बंदी घालण्यात आली आहे.पावसाचा जोर वाढल्याने तसेच घाट रस्त्यांवरील दरड कोसळण्याच्या घटना घडत असल्याने व घाट रस्ते वाहतुकीसाठी धोकादायक असल्याने जिल्ह्यातील महत्त्वाच्या अजिंक्यतारा किल्ला,ठोसेघर धबधबा, केळवली-सांडवली धबधबा,वजराई धबधबा,कास पुष्प पठार,एकीव धबधबा, कास तलाव,बामणोली,पंचकुंड धबधबा, सडावाघापूर उलटा धबधबा, ऊरुल घाट शिव मंदिर धबधबा,रुद्रेश्वर देवालय धबधबा, ओझर्डे धबधबा, घाटमाथा धबधबा, लिंगमळा धबधबा तसेच महाबळेश्वर व पाचगणी पर्यटन स्थळ, व धरणे अशा पर्यटन स्थळांच्या परीसरात पर्यटकांमुळे गर्दी होत असते.त्यावर पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने निर्बंध घालण्यासाठी जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू केला आहे. पावसाळ्यातील पर्यटनासाठी येणा-या नागरीकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता दिनांक २० जून ते १९ ऑगस्ट पर्यंत खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करीत आहे. पावसामुळे वेगाने वाहणा-या पाण्यात उतरणे व पोहणे.धबधब्यावर जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे,पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे धबधबे, द-यांचे कठडे, धोकादायक वळणे इत्यादी ठिकाणी,सेल्फी काढणेस व कोणत्याही स्वरुपाचे चित्रिकरण करणे.पावसामुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक धबधब्यांचे परिसरामध्ये मद्यपान करण्यास व मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतुक करणे, अनाधिकृत मद्य विक्री करणे व उघडयावर मद्य सेवन करणे, वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबविणे. वाहन अतिवेगाने अथवा वाहतुकीस अडथळा होईल असे वेगाने चालविणे. वाहनांची ने-आण करतांना बेदकारपणे वाहन चालवून इतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे.सार्वजनिक ठिकाणी खाद्य पदार्थ,कचरा, काचेच्या व प्लास्टीकच्या बाटल्या,थर्माकॉलचे व प्लास्टीकचे साहित्या उघडयावर इतरत्र फेकणे.सार्वजनिक ठिकाणी येणा-या महिलांची छेडछाड करणे, टिंगल टवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य अश्लिल हावभाव करणे अथवा लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे.सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजविणे, डीजे सिस्टम वाजविणे, वाहनातील स्पिकर मोठ्या आवाजात वाजविणे यामुळे ध्वनी प्रदुषण करणे. ज्या कृतीमुळे ध्वनी, वायु व जल प्रदुषण होईल असे कोणतीही कृती करणे.धबधबे,धरणे व नदी आदी परिसरात सर्व दुचाकी, चारचाकी व सहाचाकी वाहनांना प्रवेश करण्यास मनाई करणे (अत्यावश्यक सेवेतील वाहन वगळून)सदर आदेशाचे कोणतीही व्यक्ती,संस्था, संघटना यांनी उल्लघंन केल्यास ते भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम मधील तरतुदी व प्रचलित कायद्यान्वये शिक्षेस पात्र कायदेशीर कारवाईस पात्र राहतील. असे जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या पत्रकात नमूद आहे.

## व्यवसायिकांची नाराजी

पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पर्यटनावर घातलेली बंदी ही अन्याय करक असून व्यवसायिकांना प्रचंड मोठा तोटा यामुळे सहन करावा लागणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या पर्यटन स्थळावर घातलेल्या बंदीचा पुनर्विचार करावा.

–सूर्यकांत पवार
व्यावसायिक,कास.

# शिराढोण येथे शेतकरी गटाला कृषी विभागामार्फत सोयाबीन बियाणे वाटप




आरंभ मराठी | शिराढोण

कळंब तालुक्यातील शिराढोण येथे महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान योजनेमधून शेतकरी गटातील २५ शेतकऱ्यांना सोयाबीन बियाणे वाटप करण्यात आले. तालूका कृषि अधिकारी भागवत सरडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान योजनेमधून शिराढोण येथील एका शेतकरी गटास अनुदानावरील बियाणे देण्यासाठी सहाय्यक कृषि अधिकारी शिराढोण पी.एच.गायकवाड यांनी सुरुवातीला योजनेची सविस्तर माहिती असलेली नोटीस ग्रामपंचायतला डकवली. गावातील नोंदणीकृत शेतकरी गटाचे अध्यक्षांना ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज देण्याचे आवाहन केले. त्यानंतर दिलेल्या मुदतीत प्राप्त अर्जांची छाननी करून त्यापैकी पात्र अर्जांची गावच्या सरपंच लक्ष्मी म्हेत्रे व अर्ज केलेल्या गटाचे अध्यक्ष यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत कार्यालय शिराढोण येथे ऑफलाइन लॉटरी काढून कृषि समृद्धी शेतकरी गटाची निवड केली. निवड केलेल्या गटाचे अध्यक्ष यांनी आवश्यक कागदपत्रे दिल्यानंतर गटातील २५ सभासदांना प्रत्येकी १ बॅग सोयाबीन बियाणे वाटप करण्यात आले. यावेळी सहाय्यक कृषि अधिकारी पी.एच.गायकवाड, गटाचे अध्यक्ष जगदीश जोशी, सचिव राजेंद्र कापसे, माजी पंचायत समिती सदस्य राजेश्वर पाटील, अजय पाटील, नाशेर पठाण, सुरेश महाजन व इतर सभासद शेतकरी उपस्थित होते.

# बोगस डॉक्टरांवर कारवाईच्या आश्वासनानंतर आत्मदहन आंदोलन स्थगित

आरंभ मराठी | तुळजापूर



तुळजापूर तालुक्यातील अनेक ठिकाणी ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाला असून, यावर कारवाई करावी यासाठी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडून शुक्रवारी (दि.२०) आत्मदहन आंदोलन करण्यात येणार होते. मात्र तालुका आरोग्य अधिकारी तसेच पोलीस निरीक्षक यांनी बोगस डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याने हे आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याचे भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांनी सांगितले. दरम्यान पोलिसांनी तालुक्यातील एका बोगस डॉक्टरवर गुन्हा नोंद केला असून तो डॉक्टर फक्त दहावी शिक्षण असूनही एका गावात दवाखाना चालवत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे तालुक्यात असे अनेक डॉक्टर असण्याची शक्यता असून त्यांच्यावर कारवाई करावी या मागणीसाठी भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडून तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय यांच्या कार्यालयासमोर आत्मदहन आंदोलन करण्यात येणार होते. दरम्यान या आंदोलन स्थळी पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे यांनी यापुढील काळात बोगस डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिल्याने हे आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याचे भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या वतीने सांगण्यात आले. यावेळी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खड्डे बुजवणाऱ्या महापालिकेने सोसायटीतच खड्डे खोदले

## कोल्हापूर महानगरपालिकेचे उफराटे धोरण, खाजगी सोसायटीत खड्डे खोदल्याने नागरिकांना धोका

आरंभ मराठी | कोल्हापूर



शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजवण्याचे काम करणाऱ्या कोल्हापूर महापालिकेने नागरिकांचे वास्तव्य असलेल्या सोसायटीतच खड्डे खोदून रहिवाशांच्या जिवाला धोका निर्माण केला आहे.या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. वारंवार विनंती करूनही महापालिकेचे अधिकारी,कर्मचारी नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत नसल्याचे सांगण्यात येत आहे. कोल्हापूर शहरातील कळंबा- पाचगाव रोड इथल्या आनंद प्राईड या सोसायटी परिसरात महानगरपालिकेने दहा दिवसांपूर्वी चार खड्डे खोदून ठेवले आहेत. त्यातील एक खड्डा सोसायटीच्या मुख्य प्रवेशद्वारावर खोदण्यात आला आहे. पंपाच्या दुरुस्तीचे कारण पुढे करून खोदकाम करण्यात आले असले तरी अद्याप या भागात कोणतेही काम सुरू न केल्याने परिसरातील नागरिकांचे हाल होत आहेत. शिवाय या खड्ड्यांमुळे नागरिकांना धोका निर्माण झाला आहे.महापालिकेच्या या खोदकामामुळे खाजगी सोसायटीतील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या सोसायटीच्या चेअरमनने वेळोवेळी प्रशासनाशी पाठपुरावा केला. मात्र, त्यांना महापालिका प्रशासनाने दाद दिली नाही. केवळ काम सुरू होईल, काम सुरू होईल, असे आश्वासन देण्यात येत आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे. अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू, असा इशारा परिसरातील तसेच सोसायटीतील नागरिकांनी दिला आहे.

# नळदुर्ग येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांचे मॅथ जिनिअस ऑलिम्पियाड स्पर्धेत यश

## २६ विद्यार्थ्यांनी पटकावली पदके

आरंभ मराठी | नळदुर्ग




सन २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या मॅथ जिनीअस ऑलम्पियाड परिक्षेत नळदुर्ग येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. या परीक्षेत शाळेतील एकूण १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी २६ विद्यार्थ्यांना गोल्ड, सिल्व्हर, कॉपर आणि ब्राँझ पदक मिळाले. या सर्व विद्यार्थ्यांना २० जून रोजी शाळेत पदक व प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. गोल्ड पदक मिळालेले विद्यार्थी गुनके हुरेन (१ली), पार्थ कौरव (२री), क्रांतिवीर बागडे (३री), नेहा कौरव (४थी), ईश्वरी सर्जे (५वी), संस्कृती लोहार (३री वागदरी). सिल्वर पदक प्राप्त विद्यार्थी- भक्ती महाबोले (१ली), रुद्राक्ष जमादार (२री),साईराज वाघमारे(३री),विद्या पन्हाळकर (४थी),वरद जाधव (५वी), श्रुती घोडके (४थी नंदगाव).कॉपर पदक प्राप्त - अदिबा शेख, अबुझर शेख (१ली), सानिया लोहार (३री) अजिंक्य भुरे (४थी नंदगाव), अर्चित महाबोले, श्रेयस कलाल, ओवेस शेख, अथर्व घोडके (४थी), श्रद्धा हजारे (५वी), मीरा देडे (५वी).ब्राँझ पदक प्राप्त -शिवाजी कदम (१ली) पद्माक्ष सुरवसे, अदिल ईनामदार (३री),सागरिका काटे (४थी नंदगाव), अहमद शेख (५ वी) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या परीक्षेत नळदुर्गसह नंदगाव, वागदरी येथील शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत यश संपादन केले. यावेळी मुख्याध्यापक भास्कर मस्के, सहशिक्षक बिलाल सौदागर, राहुल खोडके, सुंदर भालकटे, वंदना चौधरी, सुरेखा मोरे, जयश्री धुमाळ, प्रीती भंडारे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय डुकरे, श्रीमती पौळ, नेताजी महाबोले, भगवंत सुरवसे, सलिम शेख, महेश घोडके, मारूती वाघमारे यांच्यासह पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

# ज्ञानज्योती पुरस्कार २०२५ जाहीर; विविध क्षेत्रातील आठ मान्यवरांचा गौरव

आरंभ मराठी | उमरगा




ज्ञानज्योती सामाजिक बहुउद्देशीय संस्था, उमरगा यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिला जाणारा ज्ञानज्योती पुरस्कार २०२५ यंदा आठ मान्यवरांना जाहीर करण्यात आला आहे. येत्या ६ जुलै २०२५ रोजी ओम बालाजी मंगल कार्यालय येथे भव्य सोहळ्यात या पुरस्कारांचे वितरण होणार असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा ॲड. आकांक्षा ज्ञानराज चौगुले, उपाध्यक्ष विजयकुमार वडदरे व सचिव प्रदीप मदने यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. पुरस्कार प्राप्त मान्यवर व त्यांचे कार्यक्षेत्र पुढीलप्रमाणे असुन त्यात प्रामुख्याने प्रा. शिवमूर्ती भांडेकर (शिक्षण व साहित्य) आलुर (ता. उमरगा) येथील रहिवासी. साहित्य, आत्मचरित्र लेखन, व संशोधन क्षेत्रात योगदान. महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त, विविध संस्थांमार्फत सन्मान., प्रा. कांतराव सोमवंशी (प्रसिद्ध बासरीवादक) आष्टा (ता. लोहारा) येथील मूळ रहिवासी. १९६२ पासून बासरीवादन क्षेत्रात कार्यरत, २८ वर्षे आकाशवाणीवर नियमित कार्यक्रम आणि राज्यभरात विविध ठिकाणी सादरीकरण., योगीराज माने (ज्येष्ठ कवी व साहित्यिक) तुगाव (ता. उमरगा). जलसंपदा विभागातून उपकार्यकारी अभियंता म्हणून निवृत्त, साहित्य संमेलन व इटीव्ही साहित्य दरबारात सहभाग. चित्रपट गीतलेखन. लातूर येथील साहित्यिक संस्थांचे अध्यक्ष., रणजीतसिंह ठाकूर (राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू) उमरगा येथील रहिवासी. १९९५ ते २००० दरम्यान राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांमध्ये सहभाग. विविध राज्यांमध्ये सहभाग. पंजाबचे मुख्यमंत्री दरबारा सिंग यांच्याकडून विशेष गौरव., देवीसिंग राजपूत (ज्येष्ठ पत्रकार) येणेगूर (ता. उमरगा). लोकमतमध्ये ३५ वर्षांचा पत्रकारितेचा अनुभव. सामाजिक कार्यात सक्रिय. लोकमतच्या विभागीय पुरस्कारांनी सन्मानित. क्षत्रिय राजपूत संघटनेचे जिल्हाध्यक्ष., गोविंद पवार (प्रगतशील शेतकरी) सास्तूर (ता. लोहारा). आधुनिक शेती प्रयोगांत अग्रेसर. पेरू लागवडीतून भरघोस उत्पादन. आदर्श उपक्रमशील शेतकरी म्हणून ओळख., माधव मारूती जाधव (आदर्श सरपंच) व्हंताळ (ता. उमरगा). २०२१ पासून सरपंच. १०८००० वृक्षलागवड, जलसंधारण प्रकल्प, संत गाडगेबाबा पुरस्कार. स्मार्ट व्हिलेज योजनेत गावाची निवड. ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण कार्य., वर्षा किशोर माने (महिला गृहउद्योजिका) दाबका (ता. उमरगा). १२ वर्षांपासून बचतगटाच्या माध्यमातून घरगुती उद्योगांची यशस्वी उभारणी. स्थानिक महिलांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व. या मान्यवरांच्या कार्याला सलाम करत ज्ञानज्योती संस्था समाजातील विविध क्षेत्रातील योगदानाची दखल घेत आहे. कार्यक्रमाला मान्यवरांच्या उपस्थितीत आणि विविध क्षेत्रातील प्रतिनिधींनी साक्षीदार होण्याची अपेक्षा आहे.

# अडथळ्याची शर्यत पार करतो तोच गुणवंत ठरतो

## गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात करियर मार्गदर्शक गणेश लोमटे यांचे प्रतिपादन

आरंभ मराठी | कळंब



जो विद्यार्थी अडथळ्याची शर्यत पार करतो तोच गुणवंत ठरतो यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावे लागतात, प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ध्येय निश्चित केले पाहिजे. आर्थिक कुवतीप्रमाणे शिक्षण घेता येत आहे, यासाठी संघर्ष विद्यार्थी व पालकांना करावा लागत आहे, पालकांनी खंबीरपणे विद्यार्थ्यांच्या पाठीमागे उभे राहिले पाहिजे असे विचार प्रसिद्ध करिअर मार्गदर्शक गणेश लोमटे यांनी कळंब येथे किसनलाल जाजू व गोविंद जाजू स्मृती समारोह समिती आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंखे होत्या. मंचावर गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमते, शिक्षण विस्तार अधिकारी संतोष माळी, शिक्षण विस्तार अधिकारी धाराशिव भारत देवगुडे, प्राचार्य पांडुरंग भवर, धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश टेकाळे, किसनलाल जाजू व गोविंद जाजू, समारोह समितीचे प्रवर्तक श्रीनिवास जाजू यांची उपस्थिती होती.शिक्षण अधिकारी सुधा साळुंखे यांनी आपल्या मार्गदर्शनात स्पर्धा परीक्षेमध्ये महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी हे उत्तर प्रदेश, तामिळनाडू या राज्यापेक्षा कमी असतात याकडे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांनी एकाग्रता वाढवली पाहिजे, जीवनाची दिशा निश्चित केली पाहिजे असे सांगितले. या कार्यक्रमात इयत्ता दहावी परीक्षेत १०० टक्के गुण मिळवलेल्या दोन विद्यार्थ्यांना रोख राशी विभागून १०,००० रुपये व पाच विद्यार्थ्यांना स्वर्गीय किसनलाल जाजू व गोविंद जाजू ट्रॉफी, पेन, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र तसेच तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळेतील प्रथम व द्वितीय क्रमांकाचे गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र, पेन, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उन्मेश पाटील, डॉ. गिरीष कुलकर्णी, सुरेश टेकाळे, काकासाहेब मुंडे, अशोक शिंपले, विक्रम गायकवाड, माधवसिंग राजपूत, विक्रम मायाचारी, सोपान पवार, शंकर गोंदकर, शरद खंदारे, सोमनाथ सावंत, ज्ञानेश्वर तोडकर, परमेश्वर मोरे, प्रशांत पुडवळ, मुंदडा,सचिन क्षिरसागर यांनी परिश्रम घेतले.

### यांचा झाला गुणगौरव

१०० टक्के गुण मिळालेल्या गोसावी असावरी अशोक आणि अडसूळ कृष्णा विलास यांना १०,००० हजार रुपये विभागून देण्यात आले. तसेच शेळके ओम अनिल, पांगळ मोहित संतोष, शेळके अक्षरा अनिल, इखे आशुतोष अशोक यांचाही बक्षिसे देऊन सत्कार करण्यात आला.

### ५ विद्यार्थ्यांना आर्थिक मदत

आर्थिक कमकुवत घटकातील ५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५००० हजार रुपये आर्थिक सहाय्य म्हणून देण्यात आले

१.वाळके तन्वी महादेव, विद्याभवन हायस्कूल, कळंब.
२ कु.वैद्य पूनम सतीश, जि.प. प्रशाला, खामसवाडी.
३. वैष्णवी चांदणे, छत्रपती शिवाजी विद्यालय, जवळा.
४. प्रथमेश प्रशांत उपाडे, सावित्रीबाई फुले विद्यालय, कळंब.
५. स्नेहल धनंजय टोपे, धरणग्रस्त विद्यालय, लोहटा पूर्व

# अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ पादुका पालखी दिंडीचे येरमाळ्यात उत्साहात स्वागत

आरंभ मराठी | येरमाळा



अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाव्दारे काढण्यात आलेल्या राज्य परिक्रमा करणाऱ्या पादुका पालखीचे येरमाळा येथे उत्साहात स्वागत करण्यात आले. गुरुवारी (ता.१९) येरमाळा येथील आर. एम.बारकुल यांच्या घरी पंधरा वर्षापासून येणाऱ्या या पादुका पालखी दिंडीचे शेकडो स्वामी भक्तांसह मोठ्या उत्साहात आरती,नैवेद्य दाखवून स्वागत करण्यात आले. अक्कलकोट येथील निघणाऱ्या या स्वामी समर्थ महाराजांच्या पादुका पालखी दिंडीचे हे २८ वे वर्ष असुन मार्गक्रमण करताना दिंडी प्रत्येक गावात ५ -६ तास विश्रांती घेत चहापाणी, कुठे अल्पोपहार, कुठे जेवण दिंडीच्या मुक्कामी गावात भजन, भारूड, आरती, हरिपाठ हा नित्यक्रम असतो. यात स्थानिक स्वामी साधक, सेवेकऱ्यांची गर्दी असते.येरमाळा येथील श्री स्वामी समर्थ पारायण,सेवेकरी,महिला, पुरुष भक्तांनी स्वामी पादुका दिंडी पालखीच्या दर्शनासह महाप्रसादाचा लाभ घेतला. श्री स्वामी समर्थ यांची ही दिंडी वटवृक्ष स्वामी देवस्थानात पादुका पूजन करून निघते. अक्कलकोट, मुंबई, कोकण, कर्नाटक, गोवा, पुणे, सोलापूर, धाराशिव, लातुर या जिल्ह्यांमधुन परिक्रमा करुन सलग सहा महिन्यांच्या कालावधीनंतर २६ जुनला अक्कलकोटच्या वटवृक्ष मंदिरात पोहोचुन या दिंडीची सांगता होते. भक्त वृद्ध, शारीरिकदृष्ट्या अशक्त, आजारी, असतात अशा भक्तांना प्रत्यक्ष स्वामींच्या पादुकांचे दर्शन मिळावे यासाठी गावोगावी जाण्याचा हेतु या दिंडीचा आहे. असे दिंडीचे नेतृत्व करणारे संजय कुलकर्णी महाराज यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# स्थापत्य विभाग प्रमुखपदी प्रा. सचिन सगरे यांच्या निवडीबद्दल सत्कार

आरंभ मराठी |तुळजापूर

सचिन सगरे यांची श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे स्थापत्य विभाग प्रमुख म्हणून निवड झाली. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुहास गायकवाड, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संदीप गंगणे, शहर सरचिटणीस धैर्यशील दरेकर, सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा पवार, काजल राठोड व इतर मान्यवर अभियांत्रिकी कॉलेज येथील कर्मचारी वृंद उपस्थित होते.



www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
आपलं धाराशिव.
शनिवार, दि.21 जून 2025

# स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षात पहिल्यांदाच लोहारा तालुक्यातील करवंजी गावात एसटी दाखल

## आमदार प्रविण स्वामी यांच्या पाठपुराव्याला यश; ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण

आरंभ मराठी | लोहारा




लोहारा तालुक्यातील करवंजी येथे स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच बस दाखल झाली. गुरुवारी (दि. १९) करवंजी मार्गे बससेवा चालू झाली आहे. आमदार प्रविण स्वामी यांनी निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार पाठपुरावा करून बस चालू करून दिली. त्यामुळे आमदार स्वामींनी आश्वासनपूर्ती केली असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. एसटी बस सेवा सुरू झाल्यामुळे शाळकरी विद्यार्थी, अर्ध्या तिकिटाचा लाभ घेणाऱ्या महिला आणि अमृतमहोत्सवी साजरा केलेल्या वृद्ध नागरिकांना या एसटी बसचा मोठा फायदा होणार आहे. लोहारा तालुक्यातील करवंजी हे लहान गाव आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ९५१ इतकी लोकसंख्या असलेल्या या खेडेगावात इयत्ता सातवीपर्यंत शाळा आहे. पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना उमरगा तालुक्यातील सुपतगाव, लोहारा तालुक्यातील हराळी, माकणी याठिकाणी जावे लागते. या गावातील नागरिकांना लोहारा या तालुक्याच्या मुख्यालयाला येण्यासाठी कसलीही सोय नव्हती. त्यांना हराळी येथे चालत येवून तेथून बसची वाट पहावी लागत होती. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत या गावात बससेवा चालू झाली नव्हती. त्यामुळे या गावातील ग्राम स्थांना बस गावात कधी येणार, याबाबत कुतुहल होते. मागील विधानसभा निवडणुकीत आमदार प्रविण स्वामी हे करवंजी येथे प्रचारासाठी आले असता ग्रामस्थांनी बस सेवा चालू करून देण्याची विनंती केली होती. तर आमदार प्रविण स्वामी यांनी बस चालू करून देण्याचे आश्वासन करवंजी ग्रामस्थांना दिले होते. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा शिवसेना जिल्हा संघटक ॲड. दिपक जवळगे यांच्या मार्गदर्शनाखाली करवंजीचे सरपंच विलास कांबळे, माजी सरपंच बिभीषण हाके यांनी ग्रामपंचायतीचा ठराव घेवून उमरगा आगार प्रमुखांना करवंजी मार्गे बस चालू करण्याची विनंती केली.या प्रस्तावाचा आमदार प्रविण स्वामी, ॲड. दिपक जवळगे, माजी सरपंच बिभीषण हाके, सरपंच विलास कांबळे यांनी नियमितपणे पाठपुरावा केला. त्यामुळे बुधवारी (दि.१८) उमरगा आगाराची बस करवंजी येथे दाखल झाल. शुक्रवारी (दि. १९) उमरगा आगारातून एसटी महामंडळाची बस सकाळी ७:०० वाजता निघाली.

### शाळा सुटण्याची वेळ पाहून विध्यार्थीची सोय

उमरगा – दाळींब–नळवाडी– सुपतगांव– करवंजी – हराळी,धानुरी मार्गे लोहारा, भातागळी ही बस दाखल झाली. सकाळी सुमारे ९:१५ वाजता लोहारा येथून त्याच मार्गाने परत जाते. या वेळेनुसार व त्याच मार्गाने नियमितपणे चालू राहणार आहे. शाळा सुटण्याची वेळपाहून विद्यार्थ्यांची सोय होईल, अशा वेळेनुसार ती बस सोडण्यात येईल, अशी माहिती उमरगा आगार व्यवस्थापक प्रसाद कुलकर्णी यांनी सांगितले. यामुळे करवंजीच्या ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम आज तुळजाभवानी स्टेडियममध्ये होणार



आरंभ मराठी | धाराशिव

शनिवारी (दि.२१) आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार असून, त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत योग दिनाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शोभा जाधव,जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव,जिल्हा आयुष अधिकारी श्री.गजानन परळीकर,शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री.अशोक पाटील,जिल्हा युवा अधिकारी वैभव लांडगे,योगेश थोरबोले (जिल्हा योग असोसिएशन), श्री.राम ढेरे (पतंजली योग समिती), आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रतिनिधी नंदकिशोर तांबडे,तसेच अनेक शासकीय व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत निर्णय घेण्यात आला की, जिल्हास्तरावरील मुख्य कार्यक्रम २१ जून रोजी सकाळी ७ वाजता श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियममधील बॅडमिंटन हॉल येथे आयोजित केला जाईल.जिल्हा प्रशासन,आयुष विभाग,जिल्हा क्रीडा अधिकारी, नेहरू युवा केंद्र,आर्ट ऑफ लिव्हिंग, क्रीडा भारती, योग असोसिएशन व पतंजली योग समितीच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी श्री.कीर्ती पुजार व जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी आस्थापना, शाळा,महाविद्यालये आणि गावपातळीवरील संस्थांना योग दिन सकाळी ७ ते ८ या वेळेत त्यांच्या सोयीच्या ठिकाणी साजरा करण्याचे आवाहन केले आहे. योगाभ्यासाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक आरोग्य जपणाऱ्या, सुसंस्कृत व जागरूक नागरिकांचा विकास हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून,योगाचा प्रचार व प्रसार करण्यावर भर दिला जाणार आहे.

# २५ वर्षापासून शेत रस्त्याचा प्रश्न प्रलंबित

आरंभ मराठी | नारंगवाडी



उमरगा तालुक्यातील नारंगवाडीची वाडी हे गाव पुनर्वसन होवुन १९९९ मध्ये नवीन जागेत स्थलांतरित झाले आहे. गावातील ८० टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. ५०० लोकसंख्या असलेल्या या छोट्याशा गावात १९९९ पासून शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठीच्या रस्त्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. भारत हा कृषी प्रधान देश असला तरी जवळपास २५ वर्ष येथील शेतकऱ्यांना रस्त्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. या गावच्या शेतकऱ्यांना जाण्यासाठी रस्त्याचा प्रश्न केव्हा मार्गी लागेल या प्रश्नाची उत्तरे कोणाकडेही नाही. बऱ्याच वेळा तहसील कार्यालयास अर्ज ही देण्यात आले. तरीही गावच्या शेतीला जाणाऱ्या रस्त्याचा मार्ग मोकळा झाला नाही. यापुढे तरी उमरगा तहसील कार्यालयाकडून नवीन शासन निर्णयानुसार ९० दिवसांच्या आत निकाल देणे आवश्यक आहे. पण तहसील कार्यालय काय कार्यवाही करते याकडे लक्ष आहे. शेतरस्त्याची बरीच प्रकरणे प्रलंबित आहेत ती वेळेत निकाली निघणे गरजेचे आहे अशी शेतकरी वर्गातून मागणी होत आहे.

# ईट येथे दर्गाह परिसरात युवकांकडून वृक्ष लागवड



आरंभ मराठी | ईट

भूम तालुक्यातील ईट येथील सय्यद सादात अली (रहे.) दर्गाह परिसर व कब्रस्तान मध्ये मुस्लिम बांधवांच्या वतीने शुक्रवारी (दि.२०) शेकडो वृक्षाची लागवड करण्यात आली. हिंदू–मुस्लिम ऐक्याचे प्रतीक सय्यद सादत अली (रहे.) दर्गाह ओळखला जातो. या दर्गाह मध्ये सर्व जाती–धर्माचे लोक येत असतात. परिसरामध्ये व रस्त्यांच्या कडेला विविध जातीचे वृक्ष लागवड करण्यात आली आहे. यामध्ये अशोका, पाम, नारळ यासारख्या व विविध प्रजातीच्या अनेक झाडांची लागवड हैदराबाद येथील प्रसिद्ध संत हजरत डॉ.मिर्झा सरफराज बेग (कलंदर) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या वृक्ष लागवड प्रसंगी सरपंच संजय असलकर, ज्येष्ठ नागरीक अब्दुल्ला काझी, दर्गाहचे मुतवली सरफराज (फैसल) काझी, बापू हुंबे, तोसिफ पठाण, समीयोदीन काझी, भंपू शिंदे, बाळु भागवत, युवराज पवार, रमेश कळसकर, बाबासाहेब, हूंबे, नामदेव दळवी यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. कब्रस्तानच्या संरक्षक भिंतीच्या चारही बाजूनीं मोकळी जागा असल्यामुळे या ठिकाणी शासनाच्या वृक्ष लागवड मोहिमेतून विविध देशी प्रजातीच्या वृक्षांची लागवड झाल्यास या परिसराला एखाद्या उद्यानाचे स्वरूप येईल. या दृष्टीने वन विभागाकडे प्रयत्न करणार असल्याचे युवकांनी सांगितले.

# भावना शिंदे सोलापूर विद्यापीठात केमिस्ट्री विषयात प्रथम



आरंभ मराठी | परंडा

परंडा येथील वैदू समाजातील विद्यार्थीनी भावना शामराज शिंदे बार्शी येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयात बी एससीचे शिक्षण घेत आहे. तिने सोलापूर विद्यापीठात ९४.२५ टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला. वैदू समाजातून प्राविण्य मिळवणारी एकमेव विद्यार्थिनी म्हणून भावना शिंदे हिचे नाव झाले आहे. या निमित्ताने जेष्ठ साहित्यिक तुकाराम गंगावणे यांनी त्यांच्या कार्यालयात भावना शामराज शिंदे हिला पुष्प हार, गुच्छ व पुस्तके देऊन सन्मान केला. यावेळी इंजिनियर राहूल बिराजदार , उद्योजक प्रमोद बोराडे, छत्रपती शासन ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष प्राणजित गवंडी, वंचित बहुजन आघाडीचे तालूका अध्यक्ष मोहनदादा बनसोडे, संघटक मधूकर सुखसे, इंजिनियर रेड्डी, राजेश खंडागळे, रमेश जगताप, राजाभाऊ कदम, निरंजन शिंदे हजर होते. भावना शिंदे विद्यापीठात केमेस्टी विषयात प्रथम आल्याने सर्वत्र कौतुक होत आहे .

# शिवसेनेचा वर्धापन दिन ढोकी येथे उत्साहात साजरा

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव तालुक्यातील ढोकी येथे शिवसेना पक्षाच्या ५९ व्या वर्धापन दिनानिमीत्त (दि.१९) ढोकी व परिसरातील आतापर्यंत कुठलाच लाभ न भेटलेल्या बांधकाम कामगार बंधू भगिनींना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांच्या प्रयत्नातून ५९ बांधकाम कामगारांना सामाजिक बांधिलकी जपत संसार उपयोगी भांड्याच्या किटचे वाटप करण्यात आले. यावेळी बांधकाम कामगार सेना जिल्हाप्रमुख अरुण डोलारे, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन अनंतराव (अण्णा) देशमुख, झुंबर आबा बोडके, गुणवंत (आप्पा) सुतार, प्रभाग संघाच्या अध्यक्षा सविताताई सुतार, ग्रामपंचायत सदस्या विमलताई डोलारे, अनिता ताई डोलारे, शहर प्रमुख पंकज देशपांडे, अण्णासाहेब कोळी,दत्ता जाधव,नानासाहेब सगर, विनोद थोरात, आदी शिवसैनिक व महायुतीचे कार्यकर्ते बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाकूर यांच्याकडून कामगारांना छत्री वाटप

आरंभ मराठी | परंडा



भारतीय जनता पार्टीचे नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या वतीने शहर व तालुक्यातील कष्टकरी, कामगार यांना पावसापासून संरक्षण व्हावे यासाठी एक मोठी छत्री वाटप करण्यात आली. परंडा तालुक्यातील गरीब कष्टकरी, कामगार आपल्या उदरनिर्वाहासाठी रोज ऊन, वारा, पावसात काम करतात. या गोरगरीब कष्टकरी जनतेला ऊन्हात व पावसाळ्यात होणारी अडचण लक्षात घेऊन भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांनी आपल्या स्वखर्चाने मोठी छत्री देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. जहीर चौधरी, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड. संतोष सुर्यवंशी, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष अविनाश विधाते, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस रामकृष्ण घोडके, युवा नेते समरजीतसिंह ठाकूर, शहर उपाध्यक्ष धनंजय काळे, गौरव पाटील, मनोहर पवार, सिध्दीक हन्नुरे, आदर्श ठाकूर, अमर ठाकूर , सुरज काळे, व्यंकटेश दिक्षित, रामदास गुडे, किरण कवटे, हिमालय वाघमारे, मिलिंद शिंदे, महिला मोर्चा शहराध्यक्षा जोतीताई भातलवंडे तसेच इतर मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रिपाइंच्या जिल्हा कार्यकारिणीची बुधवारी बैठक

आरंभ मराठी | धाराशिव

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणीची जिल्हा बैठक बुधवार, २५ जून रोजी दुपारी २ वाजता शहरातील शासकीय विश्रामगृह, पोलीस मुख्यालयासमोर आयोजित करण्यात आली असून, बैठकीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांसंदर्भात चर्चा होणार आहे. तसेच जिल्हा कार्यकारिणी, तालुका कार्यकारिणी, शहर व विविध आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात येणार आहेत. बैठकीसाठी प्रदेश सहसचिव राजाभाऊ ओहाळ, राज्य चिटणीस संजयकुमार बनसोडे, एस. के. चले,मराठवाडा कार्याध्यक्ष आनंद पाडागळे, भागवत शिंदे, तानाजी कदम, बंडूभाऊ बनसोडे आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. जिल्ह्यातील विविध आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे,असे आवाहन जिल्हाध्यक्ष विद्यानंद बनसोडे, रंजीत गायकवाड, सिद्धार्थ ओव्हाळ, सोमनाथ गायकवाड, प्रवीण बनसोडे यांनी केले आहे.

# शक्तीपीठ ते भक्तीपीठ पायी दिंडीचे १ जुलैला प्रस्थान

आरंभ मराठी | तुळजापूर



प्रति वर्षाप्रमाणे यावर्षी तुळजापूर येथील विठ्ठल रुक्मिणी सेवा मंडळाच्या वतीने शक्तीपीठ ते भक्तीपीठ पायी दिंडीचे १ जुलै रोजी सकाळी ८ वाजता पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून, या दिंडीचे हे १७ वे वर्ष आहे. तुळजापूर येथील कासार गल्लीतील विठ्ठल मंदिर सेवा मंडळ यांची पायी दिंडी दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त शक्तीपीठ–भक्तीपीठ पायी दिंडी निघते. यावर्षी ६ जुलै रोजी आषाढी एकादशी असून, यानिमित्त १ जुलै रोजी निघणार असे झालेल्या बैठकीत सांगण्यात आले. या बैठकीस अमर मगर,धनंजय हिंबारे सुहास साळुंके, हभप खंडू महाराज गवळी, सुदर्शन वाघमारे,चंद्रशेखर जगताप,शुभम खोले, वल्लभ कदम इत्यादी उपस्थित होते. दरवर्षी वारीमध्ये ३०० ते ३५० महिला पुरुष सहभागी होतात यावर्षी ५०० च्या वर वारकरी निघतील असा अंदाज बैठकीत सांगण्यात आले.

# जनता विद्या मंदिर सीईटी सेलचे पहिल्याच वर्षी घवघवीत यश

## यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान

आरंभ मराठी | मुरुड



रुरल एज्युकेशन सोसायटी संचलित जनता विद्या मंदिर सीईटी सेल यांनी पहिल्याच वर्षी घवघवीत यश संपादन केले आहे. उच्च माध्यमिक मध्ये शिकणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी संस्थेने सुरू केलेल्या नवीन उपक्रम म्हणजे जे. व्हि. एम सीईटी सेल. येथे नीट/जेईई/एम एच सीईटी कोर्स चे वर्ग सुरू केले आहेत. त्यात पहिल्याच वर्षी विद्यार्थ्यांनी यशाचे शिखर गाठले आहे. जनता विद्या मंदिर सिईटी सेल मध्ये एकूण छप्पन विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला होता. त्यापैकी चार विद्यार्थी हे एनआयटी मध्ये प्रवेशास पात्र झालेले आहेत. चार विद्यार्थी हे बीएस्सी नर्सिंग पात्रता परीक्षे मध्ये विशेष प्राविण्यसह प्रवेशास पात्र झालेले आहेत. एम एच सीईटी पीसीबी ग्रुप मधून तेवीस विद्यार्थी पात्र झालेले आहेत. तसेच एम एच सीईटी पीसीएम ग्रूप मधून पंचवीस विद्यार्थी इंजीनियरिंग प्रवेशास पात्र झाले आहेत. एनआयटी प्रवेशास पात्र झालेले विद्यार्थी बनसोडे सुमित, कंदले गीता, गुंड मोनिका, शेळगे अरुंधती यांनी विशेष प्राविण्यासह गुण घेऊन यश संपादन केलेलं आहे. तसेच एम एच सीईटी पीसीबी ग्रुप मधून शिंगणापूर समृद्धी, गायकवाड उत्प्रेक्षा, शेटे स्नेहल यांनी विशेष प्राविण्यासह गुण घेऊन यश संपादन केलेलं आहे. तसेच एम एच सीईटी पीसीएम ग्रूप मधून शेळगे अरुंधती, गोरे संध्या, पताले साक्षी यांनी विशेष प्राविण्यासह गुण घेऊन यश संपादन केलेलं आहे. त्याच बरोबर एमएच सीईटी बीएस्सी नर्सिंग मधून शेटे स्नेहल, वाघमारे प्रणवी, जाधव शीतल यांनी विशेष प्राविण्यासह गुण घेऊन यश संपादन केलेलं आहे. या सर्व विद्यार्थ्यांनाचे संस्थेचे अध्यक्ष यशवंतराव नाडे , संस्थेचे उपाध्यक्ष हरिश्चंद्र माने , सचिव विजय पाटील, प्रशासकीय अधिकारी अमर मोरे कोषाध्यक्ष बी .एस. पटाडे सहसचिव विवेक पांगळ , संस्थेचे पदाधिकारी दीपक पटाडे , मुख्याध्यापक डी . व्ही जाधव उपप्राचार्य डी.व्ही.सागावे सीईटी सेल प्रमुख एस.जी. वांगस्कर सहप्रमुख पी.एच. पटाडे, एस.एम तनमोर पी जी शिंदे, साळुंखे, गायकवाड कुलभूषण व जनता विद्या मंदिर परिवाराने सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तातडीने काढून घेण्याचे आवाहन

आरंभ मराठी | तेर




केंद्र सरकारच्या वतीने डिजिटल कृषी मिशन अंतर्गत शेतकऱ्यांना डिजिटल ओळख देण्यासाठी फार्मर आयडी कार्ड देण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. परंतु अद्यापही काही शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढला नाही. त्यांनी तातडीने फार्मर आयडी काढून घ्यावा असे आवाहन स्थानिक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. डिजिटल ओळखपत्रच्या या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनेचा लाभ होण्यासाठी या फार्मर आयडी चा उपयोग होणार आहे. डिजिटल पब्लिक इन्फास्ट्रॅक्चर फॉर एग्रीकल्चर अंतर्गत ऍग्रीस्टेक हा प्रकल्प पूर्ण देशात राबविण्यात येत आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने ही हा प्रकल्प राबविण्याचे निर्णय घेतला आहे. ॲग्री स्टॅक संकल्पने अंतर्गत शेतीविषयक योजनेचा लाभ घेण्यासाठी हा फार्मर आयडी बंधनकारक आहे. फार्मर आयडी कार्ड शेतकऱ्याच्या आधारशी लिंक करण्यात येणार आहे, जे शेतकऱ्याच्या जमिनीच्या नोंदीशी जोडले जाईल. त्यामुळे या महत्त्वपूर्ण कार्डद्वारे विविध योजनांचा लाभ होणार आहे या मिशन अंतर्गत ज्या शेतकऱ्यांची नावे जमीन आहे अशा प्रत्येक शेतकऱ्याला युनिक आयडी देण्यात येणार आहे याद्वारे सुविधांचा लाभ घेणे सोपे होईल.